ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 1 | October - 2016

Review Of Research

# मानवी अधिकारांपासून वंचितांच्या समस्या : एक अवलोकन

दत्तात्रय शिवाजी थोरात
सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र)
सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते
ता. माळशिरस, जि. सोलापूर (महाराष्ट्र—भारत)




**●प्रस्तावना :—**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासून मानवी हक्क विषयक प्रश्नांना विशेष महत्व देण्यात येऊ लागले आहे. मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. प्रत्येक व्यक्तीला 'मनुष्यप्राणी' या नात्याने हे हक्क प्राप्त झाले आहेत. मानवी हक्काशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होणार नाही. हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याशिवाय व्यक्तीला सामान्यतः स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेण शक्य होत नाही. मानवी हक्कांचे महत्वाचे वैशिष्ट म्हणजे मानव जातीच्या सर्व घटकांना, सर्व व्यक्तींना ते समानतेने प्राप्त झालेले असतात. हक्कांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा भेदभाव असू शकत नाही. मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असल्याने त्यांना राज्यसंस्थेच्या कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन मानवी हक्काचे समर्थक करतात.

**●लोकशाहीत मानवी हक्कांची प्रतिश्ठा :—**

लोकशाही व्यवस्थेला शासनव्यवस्थेचा सर्वात चांगला शासन प्रकार म्हणून व्यापक स्वरूपाची मान्यता लाभली आहे. कारण या व्यवस्थेत सर्वाधिक महत्व मानवी अधिकारांना दिले जाते. त्यामुळे आपोआपच व्यक्तीचे व पर्यायाने संपुर्ण मानव जातीचे कल्याण साधले जाते.

**● हुकूमशाहीत मानवी हक्कांची पायमल्ली :—**

हुकूमशाही किंवा एकाधिकारशाही पद्धतीमध्ये राज्यकर्ते मानवी हक्कांची पायमल्ली करण्यातच धन्यता मानतात. यामुळे अशा देशांमध्ये अनेक समस्या निर्माण होतात. या समस्या व्यक्तीचे जीवन तर प्रभावित करतातच, पण त्याचबरोबर राष्ट्राच्या व समाजाच्या सार्वजनिक जीवनातही गंभीर समस्या निर्माण करतात. त्यापैकी काही समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1.गरीबी किंवा दारिद्र्य**

गरीबी ही संपुर्ण जगाला भेडसावणारी समस्या आहे. विकसनशिल म्हणून ओळखल्या जात असलेल्या सर्वच देशातील बहुसंख्य जनता दारिद्र्यात जगत आहे. गरीबी म्हणजे ज्या परिस्थितीत मानवाला आपल्या आवश्यक किंवा प्राथमिक गरजा भागविणे शक्य होत नाही, ती परिस्थिती होय. यामुळे आपोआपच जीवनाचा स्तर ढासळतो व मानवी जीवनाचा चांगल्या प्रकारे लाभ घेणे शक्य होत नाही. ज्या कुटूंबाला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या गरजांची चांगल्या प्रकारे पुर्तता करणे शक्य होत नाही. ते कुटूंब दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहे, असे समजले जाते.

**1.1.गरीबीचे मानवी हक्कावर होणारे परिणाम :**

गरीबीचा मानवी हक्कांशी अतिशय जवळचा संबंध आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्काविषयीच्या जाहिरनाम्यात ज्या हक्कांचा अंतर्भाव करण्यात आला आहे, त्यापैकी अनेक हक्कांचा लाभ गरीब लोक घेऊ शकत नाहीत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्काविषयीच्या जाहिरनाम्यात प्रत्येकाला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि व्यक्तिगत सुरक्षिततेचा अधिकार आहे. सर्व मानव समान असून सर्वांना समान प्रतिष्ठा व अधिकार आहेत. सर्वजण कायद्यापुढे समान असून

सर्वांना कायद्याचे समान संरक्षण देण्यात येईल, असे म्हटले आहे. तसेच प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार काम करण्याचा अधिकार आहे, शिक्षणाचा, मालमत्ता धारण करण्याचा, धर्मस्वातंत्र्याचा, राजकारण, सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्याचा अधिकार आहे. ही सर्व तत्वे कितीही आदर्शवत असली तरीही गरीबीचे जीवन जगत असलेल्या लोकांना याचा लाभ घेणे शक्य होत नाही.

### 1.2.गरीब माणसे आर्थिक शोषणाचे बळी

समाजातील सर्व नागरिकांना हक्क व स्वातंत्र्य यांचा समानतेने लाभ घेण्यासाठी किमान स्तरावरील आर्थिक समानतेची आवश्यकता असते. ज्या समाजात मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता असते, तेथे कनिष्ठ वर्गातील लोक आर्थिक शोषणाचे बळी ठरतात. या वर्गाला राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा सर्व प्रकारच्या अधिकारांपासून वंचित रहावे लागते.

### 1.3. गरीब व्यक्ती मुलभूत सुविधांपासून वंचित :

दारिद्र्यरेषेखालील लोकांना पोटभर अन्नही मिळणे अवघड होते. महानगरे आणि मोठ्या शहारातील गरीब लोक झोपडपट्ट्यांमध्ये व प्रसंगी पदपथावरही वास्तव्य करीत असतात. अशा लोकांना नागरी सुविधांपासून वंचित रहावे लागते. हे घटक आपल्या कोणत्याही हक्काचा विचार करण्याच्या मानसिकतेत नसतात.

### 1.4.गरीब योजनांपासून वंचित :

सर्व मानव जन्मतःच स्वतंत्र व समान आहेत. असे संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी अधिकार विषयक जाहिरनाम्यातील तत्व सांगते. मात्र गरीब लोक आपल्याकडे असलेल्या गरीबीमुळे स्वातंत्र्य आणि समतेपासून तसेच त्या आधारित योजनांपासून वंचित राहतात. जॉर्ज ऑवॅलच्या भाषेत सांगायचे झाले तर, ''समाजाच्या खालच्या स्तरातील लोकांपेक्षा काहीजण अधिक समान असतात. सर्व प्रकारचे अधिकार व सवलती समाजातील काही मुठभर लोकांच्या वाट्याला येतात. राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांपासूनही गरीब लोक वंचित राहतात.''

### 1.5.व्यक्तिमत्व विकासाला बाधा :

प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी काही अधिकार आवश्यक असतात. पण ज्यांना गरीबीमुळे या अधिकारांचा लाभ घेता येत नाही, अशांच्या व्यक्तीमत्व विकासात अडसर निर्माण होणे स्वभाविक असते. ज्यांच्या जीवनात असे गतिरोध उभे राहतात, त्यांना चांगल्या जीवनाचा लाभ घेता येत नाही. म्हणूनच गरीबीत जीवन जगणाऱ्या व्यक्तींना आपला सर्वांगीण विकास साधणे कधीही शक्य होत नाही.

## 2.निरक्षरता :

निरक्षरता मानवाला मानवी हक्कांपासून वंचित ठेवण्यास कारणीभूत होते. निरक्षर व्यक्तीला मुळात आपणास काही अधिकार आहेत, याचीच जाणीव नसते. यामुळे अधिकारांविषयी आग्रही राहण्याचा प्रश्नच उदभवत नाही. लोकशाही व्यवस्थेच्या यशासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांपैकी साक्षरता हा एक अतिशय महत्वाचा घटक आहे. अखंड जागृक राहणे लोकशाहीसाठी आवश्यक मानले जाते. नागरीक जर जागृत राहिले नाहीत तर राज्यकर्त्यांवर दबाव किंवा वचक राहु शकत नाही. थोडक्यात निरक्षर लोकांना हक्काची जाणीव नसल्याने ते हक्कांविषयी आग्रही राहु शकत नाहीत. सहाजिकच ते आपल्या अधिकारांपासून वंचित राहतात.

### 2.1. गरीबी व निरक्षरता यांचा निकटचा संबंध :

दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांतच निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. गरीबीत जीवन जगणाऱ्या बहुसंख्य व्यक्ती निरक्षर असतात. तसेच त्या आपल्या मुलाबाळांनाही शिक्षणापासून वंचित ठेवतात. कारण निरक्षर लोकांना शिक्षणाचे महत्व पटलेले नसते.

### 2.2. निरक्षरांच्या दृष्टीने शिक्षण ही चैनीची बाब :

ज्या कुटूंबातील लोक निरक्षर असतात त्या कुटूंबातील आईवडील आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याच्या स्थितीत नसतात. त्यांच्या दृष्टीने शिक्षण ही चैनीची बाब ठरते. जेव्हा गरीबी आणि निरक्षरता हे दोन घटक एकत्र येतात. तेव्हा मानवी अधिकारांचा विचार बाजुला पडतो. म्हणूनच गरीब व निरीक्षर व्यक्ती सर्व प्रकारच्या मानवी अधिकारांपासून वंचित राहत असल्याचे जाणवते.

### 3.बेकारी :

लोकांना मानवी अधिकारांपासून वंचित ठेवण्यास बेकारी हा घटक कारणीभूत ठरतो. बेकारीचे जीवन वाट्याला आलेल्या व्यक्तीला समाजात प्रतिष्ठा दिली जात नाही. समाजातील काही घटक त्यांना सन्मान देत नाहीत. त्यामुळे असा मनुष्य मानवी अधिकारांपासून वंचित राहतो.

### 3.1. बेकारीची कारणे :

शेती व्यवसायाचे मागासलेपण–

भारतीय शेती व्यवसायाचे मागासलेपण हे बेकारीचे एक महत्वाचे कारण सांगता येईल. भारतात आजही सत्तर टक्यांच्या आसपास लोक शेती व्यवसायावर अवलंबुन आहेत आणि हा व्यवसाय मागासलेल्या अवस्थेत असल्यामुळे इतक्या मोठ्या लोकसंख्येचा भार हा व्यवसाय पेलू शकत नाही.

### 3.2. अतिरिक्त लोकसंख्या :

भारतासारख्या देशाची वाढत चाललेली लोकसंख्या हे बेकारीचे महत्वाचे कारण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा आर्थिक विकास दर जरूर वाढला. मात्र त्यापेक्षा लोकसंख्या वाढीचा वेग अधिक असल्याने बेकारीत मोठी वाढ झाली.

### 3.3. बेकारीतून उद्भवणाऱ्या समस्या :

बेकारीमुळे जीवन उद्ध्वस्त होण्याची वेळ येते, जो मनुष्य रोजगाराच्या विवंचनेत राहतो. तो जीवनातील सर्व प्रकारच्या आनंदापासून वंचित राहतो. बेकारी वाट्याला आलेल्या मानवाला अनेक संकटे येत असतात. परिणामी आपल्या अधिकारांचा लाभ घेण्याच्या अवस्थेत तो राहत नाही. संपुर्ण कुटूंबावर आणि समाजावर याचा परिणाम होतो. कुटूंबातील इतर सदस्यही मुलभूत अधिकारांपासून वंचित राहतात.

## 4.हिंसाचार :

हिंसाचारामुळे मोठ्या प्रमाणावर जिवीताची व वित्ताची हानी होते. हिंसाचाराचा त्यापेक्षा गंभीर धोका असा की, त्यातून समाजातील अनिष्ठ प्रवृत्ती डोके वर काढू लागतात व त्या संपुर्ण समाजाला वेठीस धरण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक पाहता, लोकशाही व्यवस्थेत हिंसाचाराला स्थान असण्याचे काहीच कारण नाही. मात्र ज्यांचा हिंसा, दंगली, मोडतोड या गोष्टींवरच अधिक विश्वास असतो, अशा प्रवृत्ती सनदशीर मार्गाचा त्याग करून हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करतात. समाजात हिंसाचारी प्रवृत्ती वाढीस लागल्या की, सर्वसामान्य लोकांचाही संविधानात्मक मार्गावरील विश्वास कमी होऊ लागतो. सर्वांनाच आपल्या मागण्या हिंसाचाराच्या माध्यमातून मान्य करवून घेणे अधिक सोपे वाटू लागते.

### 4.1. सामान्यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न :

हिंसाचारातून मोठ्या प्रमाणावर जिवीतहानी होते. त्याही पेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे हिंसाचाराचा मार्ग अवलंबून काही लोक संपुर्ण समाज स्वास्थ्य बिघडवतात. निरापराध लोकांना मारहाण करणे, त्यांच्यावर दहशत बसविणे अशा गोष्टी करण्यापर्यंत त्यांची मजल जाते.

### 4.2. मानवी अधिकारांवर घाला :

जेव्हा मुठभर लोक हिंसेच्या मार्गाने संपुर्ण समाजाला वेठीस धरू लागतात. तेव्हा सामान्य लोकांचे मानवी हक्क पायदळी तुडविले जातात. सामान्य लोकांना त्यांच्या इच्छेविरूध्द काहीही गोष्टी करण्यास भाग पाडले जाते. हिंसाचारी प्रवृत्ती हिंसेच्या जोरावर आपली मते समाजातील बहुसंख्य लोकांवर लादण्याचा प्रयत्न करू पाहतात, हा एक प्रकारचा सर्वसामान्य लोकांच्या मानवी अधिकारांवर घातला गेलेला घाला होय.

## 5.भ्रष्टाचार :

### 5.1. समाजाला लागलेली किड :

भ्रष्टाचार मानवी अधिकाराचा संकोच होण्यास कारणीभूत ठरतो. लोकप्रशासनात भ्रष्टाचाराचा अर्थ स्पष्ट करताना असे म्हटले जाते की, सनदी सेवेतील अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी आपल्या सार्वजनिक पदाचा व्यक्तिगत लाभासाठी वापर करणे म्हणजे भ्रष्टाचार होय. अशा भ्रष्टाचाराची झळ सर्व समाजाला पोहोचते. भ्रष्टाचारामुळे सामाजिक नीतिमत्ता ढासळू लागते आणि प्रामाणिक तत्वनिष्ठा इत्यादी मूल्ये सामाजिक जीवनातून हद्दपार होण्याची वेळ येते. काही अंतर्राष्ट्रीय संघटनांनी भ्रष्टाचाराचे प्रमाण अधिक असलेल्या देशांची एक यादी बनविली आहे. त्यात भारताचा क्रमांक खूपच वरचा आहे.

### 5.2. समाजजीवनाची सर्वच क्षेत्रे व्याप्त :

भ्रष्टाचाराची लागण समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रांना झाली असल्याचे पहावयास मिळते. कुटूंबापासून, शिक्षण क्षेत्रापासून, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रापर्यंत त्याची व्याप्ती पसरलेली दिसते. भ्रष्ट आचार याचाच अर्थ शिष्टसंमत नसलेला आचार होय. भ्रष्टाचाराचे मुळ मनुष्य स्वभावात दडलेले आहे. प्रत्येकजण आपला स्वार्थ साधण्यासाठी गैरमार्गाचा वापर करतो. भ्रष्टाचारामुळे अनेक गुणी व्यक्ती त्यांच्या अधिकारांपासून वंचित राहतात. विशेषतः गुणवंत विद्यार्थी शैक्षणिक प्रवेशापासून वंचित राहतात. सर्वसामान्य लोकांनाही याचा मोठा फटका बसतो. मानवी अधिकारामध्ये समानतेचा अधिकार विशेष महत्वाचा मानला जातो. मात्र जेथे मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो, तेथे समतेच्या तत्वाला तिलांजली दिली जाते.

## 6.दहशतवाद :

दहशतवाद या संकल्पनेत 'दहशत' हा शब्द महत्वाचा आहे. सामान्य लोकांच्या मनात दहशत किंवा भिती निर्माण करून त्यांना वेठीस घरून त्या जोरावर आपली उद्दीष्ट्ये साध्य करण्याचा काही गटांची चालविलेला प्रयत्न म्हणजे दहशतवाद होय.

### 6.1. मानवी अधिकाराच्या मार्गातील मोठा अडथळा :

जेव्हा सामान्य लोक एक प्रकारच्या भितीच्या वातावरणात जीवन जगत असतात. तेव्हा आपले जीवन सुरक्षित रहावे, एवढाच विचार त्यांच्या मनात असतो. इतर अधिकारांविषयी आग्रही राहण्याची भूमिका ते कधीच घेऊ शकत नाहीत. प्रामुख्याने जिवीताचा अधिकारच जेथे सुरक्षित नसतो, तेथे इतर अधिकार दुर्लक्षित होतात. भारताने तर फार मोठी किंमत या बाबतीत मोजलेली आहे. मोठ्या प्रमाणात जिवीत हानी व वित्तहानी झालेली आहे. श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधी हे भारताचे दोन पंतप्रधान दहशतवादाचे बळी ठरले आहेत. काश्मिर, पंजाब,

नागालॅंड, आसाम अशा अनेक भारताच्या घटकराज्यात दहशतवादाने थैमान मांडले आहे. त्यामुळे या राज्यातील सामान्य लोकांना मानवी अधिकारांपासून वंचित व्हावे लागले आहे. आंतर्राष्ट्रीय पातळीवरील काही मानव अधिकार संघटना, भारतीय सैन्य दलाने दहशतवाद्यांविरूध्द केलेल्या उपाययोजनांबाबत ओरड करतात. मात्र या दहशतवाद्यांनी सर्वसामान्य लोकांचे जीणे कसे कठीण केले आहे, याची मात्र त्यांना दखल घ्यावीशी वाटत नाही.

## ● समारोप / निष्कर्ष :

संयुक्त राष्ट्रसंघाने 10 डिसेंबर 1948 रोजी जागतिक मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिध्द केला. परिणामी संपुर्ण जगामध्ये मानवी अधिकारांबद्दल मोठे मंथन व्हायला सुरूवात झाली. याचदरम्यान भारतासारखे काही नवस्वतंत्र देश आपल्या देशवासियांसाठी संविधानाची निर्मिती करीत होते. मानवी अधिकारांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची तरतूद भारतीय संविधानाच्या मुलभूत अधिकारांमध्ये करण्यात आली. प्रस्तुत अभ्यास लेखाच्या माध्यमातून मानवी अधिकारांपासून वंचित असणाऱ्या घटकांचे अवलोकन करण्याचा हेतू होता. संविधानात्मक तरतूदी करून मानवी अधिकार निकोपपणे उपभोगता येतात का? हा एक मोठा प्रश्न आहे. गरीबी, दारिद्र्य, निरक्षरता, हिंसाचार, दहशतवाद, सत्तास्पर्धा इत्यादी घटकांमुळे बहुसंख्य लोक मानवी अधिकारांपासून वंचित राहतात. यामुळे अशा वंचित घटकांच्या व्यक्तिगत आणि सामुदायिक जीवनात अनेक पेच प्रसंग निर्माण होताना दिसतात. समग्र मानव जातीच्या कल्याणासाठी वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याची नितांत आवश्यकता आहे.

केवळ मानवी अधिकारांचे जाहिरनामे आणि संविधानात्मक तरतूदी करून प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगिण विकास होणार नाही. त्यासाठी हे अधिकार मिळविणे सर्वांना शक्य होतील अशी व्यवस्थात्मक रचना निर्माण करणे आवश्यक ठरेल. अशा रचनेमध्ये कोणीही 'वंचित' राहणार नाही. याचे उत्तरदायित्व शासनव्यवस्थेला द्यावे लागेल.

## ● संदर्भ :

मराठी / हिंदी

1. आहुजा राम, सामाजिक समस्याऐं, रावत पब्लिकेशन्स, 2000, (द्वितीय संस्करण), 2009, जयपूर.
2. कपूर एस. के., मानव अधिकार एवं आंतरर्राष्ट्रीय विधी, सेंट्रल रॉय एजन्सी, 2009, (27 वा संस्करण), इलाहाबाद.
3. खंडेला मानचंद, मानवाधिकार एवं सामाजिक न्याय, अविष्कार पब्लिशर्स, 2008, जयपूर.
4. पाटील व्ही. बी., मानवी हक्क, के' सागर पब्लिकेशन्स, 2012 (सातवी आवृत्ती), पुणे.

इंग्रजी :—

1-Aftab Alam, Human Rights In India, Raj Publication, 2012, New Delhi.
2-Chaturvedi P. M., International Relations and Human Rights, Swastik Publications, 2011, Delhi.
3-Das P. B., Human Rights in India, Sagar Publications, 2012, Jaipur.
4-Iyer Padma, Human Rights for Women, Pioneer Publishers, 2006, Jaipur.
5-Michel Ishary, The History of Human Rights, Orient Longman Ltd, 2008, Delhi.
6-Roy A. N., Human Rights, Avishkar Publications, 2007, Jaipur.